# यावल महाविद्यालयात हिंदी व इंग्रजी विभागाचे उद्घाटन संपन्न

यावल (वार्ताहर) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल येथे प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी व इंग्रजी विभागाचे उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी हिंदी राष्ट्रीय भाषा व इंग्रजी भाषेची आधुनिक जीवनात वाढलेले महत्त्व याबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले. हिंदी व इंग्रजी विभागाचे उद्घाटन प्रा. डॉ. विजय एकनाथ सोनजे (धनाजी नाना महाविद्यालय, फैजपुर) यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन संपन्न झाल्यानंतर हिंदी व इंग्रजी भाषेची आधुनिक जीवनात विविध स्पर्धा परीक्षा, शासकीय कामकाजात, मानवी विकासात व एका व्यक्तीशी दुसऱ्या व्यक्तीने संपर्क साधण्यासाठी सदर भाषेचा प्रयोग केल्याशिवाय दोघांच्या विचारांची देवाण-घेवाण होऊ शकत नाही अशी माहिती दिली. आजच्या जीवनात भाषेचे महत्व बहुमूल्य आहे असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा रावते यांनी केले तर आभार कु. तेजश्री कोलते हिने मांनले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. एस. पी. कापडे, प्रा. डॉ. पी. व्ही. पावरा, शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहकार्य केले.



